# मा.ना.सुधीर मुनगंटीवार अर्थ, नियोजन व वनमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक २८/०३/२०१५ रोजी जैवविविधता भवनाचे उद्घाटन प्रसंगीचे मनोगत.

या मंचावर उपस्थित आदरनिय अनुप कुमारजी, आदरणिय सक्सेनाजी, आदरणिय सर्जन भगतजी, श्री आदरणिय निगमजी, आदरणिय दिलीपजी, ए.एस.के.सिन्हाजी, या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित एमपीएससीचे माजी सदस्य, श्री प्रकाश ठोसरजी, इतर सर्व आदरणिय मान्यवर, नागरिक, पत्रकार बंधू भगीनींनो, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या जैवविविधता भवनाच्या कार्यालयाचे अधिकृत उदघाटन झाले असे मी आपल्या सर्वांच्या साक्षीने घोषित करतो. राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धाचे विजेत्यांना सुध्दा मनापासून शुभकामना देतो. त्याच प्रमाणे अभिनंदन करतो की ज्यांनी आपल्या थर्ड आय मधून निसर्गाची अतिशय उत्तम क्षणचित्रे, छायाचित्रे टिपलीत, त्यांनाही मी मनापासून शुभकामना देतो. संजयजी यांना, मला वाटत आज पहिले सोलर कुकर त्यांनी बुक केल असाव व त्यानंतर सोलर कुकर भेट देण्यात आला. सोलर कुकर वापरण्यासाठी अशीच सर्वांची इच्छा जागृत व्हावी हि सदिच्छा व्यक्त करतो और संजयजी मै अचानक आपके घर आके ये देखुंगा की सही मे ये सोलर कुकर उपयोग मे ले जा रहा या नही । हे खरे आहे की, या ठिकाणी श्री दिलीपजी यांनी जैवविविधतेचे महत्व आपल्या समोर प्रेझेन्टेशनच्या माध्यमातून दाखवले. एक बडी जिम्मेदारी दिलीपजी आपके उपर मे है। मै सोच रहा था की, दिलीप जिम्मेदारी शब्द का ही नाम है। दिलीप नामका ही अर्थ है प्रोटेक्टर. ए पर्सन दॅट प्रोटेक्टस सम वन ऑर समथींग और इसलिये आप पे बहोत बडी जिम्मेदारी है । ये भगवानने निर्माण की हुवी जो शृंखला है वो खंडीत नही होनी चाहिये। खर तर वन मंत्री व्हायच्या अगोदर मी ज्या मतदारसंघातून येतो, त्या मतदार संघात जंगल आहे. त्या मतदार संघामध्ये वन्य प्राणी आहे. म्हणजे आज तर मी हे छातीवर हात ठेवून अभिमानाने सांगतो की आशिया मधे सर्वात जास्त वाघ कोणच्या मतदारसंघात असतील तर ते माझ्या मतदारसंघात आहेत. परवा जेव्हा उध्दव ठाकरेजी यांची भेट झाली तेव्हा मी सांगीतले की वाघाचे संवर्धन व वाघाची संख्या वाढवावयाची असेल तर ती माझीच जबाबदारी आहे. तुमच्या लक्षात नाही आले पण ते समजले. हि श्रृंखला तूटता कामा नये म्हणून कदाचीत आपल्या धर्मामध्येच जैवविविधतेचे महत्व अप्रत्यक्ष आपल्या मनावर बिंबवण्याच्या प्रयत्न झाला. मला आठवते की, आमची आई जेव्हा श्रीगणेशाची स्थापना करायची त्यावेळेस २१ पत्री देवाच्या चरणी अर्पण करण्यासाठी पाठववयाची, तेव्हा हे लक्षात आले नाही. आज मात्र त्याच महत्व समजत की, हि जी जैवविविधता आहे या श्रृंखलेपैकी एक कडी जरी तुटली तर ? लहाणपणी शिक्षकांच्या तोंडी क्लायमेट चेंज, ग्लोबल वॉर्मिग हे शब्द कधी मी ऐकत नव्हतो. पण आता विधी मंडळामध्ये क्लायमेट चेंज, ग्लोबल वार्मिंग वगैरेवर चर्चा होते. क्लायमेट चेंजची किंमत किती तर मागच्या वर्षी ७.५० हजार कोटी रूपये. कारण जेव्हा आम्ही श्रृंखला तोडण्याचा प्रयत्न केला तेव्हा ईश्वराच्याही लक्षात आले की, मनुष्य माझ्याशी स्पर्धा करायला निघाला आणि हि श्रृंखला जेव्हा तुटते तेव्हा लक्षात आल कि, मनुष्याचा सर्वात मोठा शत्रु कोण तर मनुष्यच आहे. मनुष्याने सृष्टी नष्ट करण्याचे काम केले आहे. कोणीतरी म्हणते ते खरे आहे कि सारी मनुष्य सृष्टी नष्ट झाली तरी वनसृष्टी कधीच नष्ट होणार नाही. पण ज्या दिवशी सृष्टी नष्ट होईल तेव्हा

मात्र वनसृष्टी कोणी मनुष्य टिकवू शकणार नाही. हे खरे आहे की, " हम सब पैसे के पिछे दौड रहे है" । मला परवाच एक जण म्हणाले की, "सारी दुनियाच नोटो के पिछे दौड रही है" । पर उनको पता नही की ये नोट बनानेकेलीये जो कागज लगता है वो कागज वन मंत्री सुधीर भाऊ आपके पेडसे बनता है। अगर ये पेड नही रहे तो कागज कैसा बनेगा और कागज नही रहे तो नोट कैसे बनेंगे । और नोट नही बनेंगे तो अमीर कहांसे बनेंगे । हे झाडाचे महत्व आहे. वृक्ष आहे तर श्रीमंती आहे. हे वृक्ष नसेल तर श्रीमंती नाही. म्हणून जैवविविधता हि पुस्तकाच्या बाहेर काढावे लागेल. ह्यात आपला लोकसहभाग वाढवावा लागेल. ही आपली जवाबदारी आहे. अन्यथा फक्त सरकार आणि कायद्याच्या पुस्तकातून आपण सुंदर पुस्तक छापू शकतो पण हे पुस्तक या पुस्तकाची भाषा या पुस्तकाची भावना ही लोकांच्या ह्दयापर्यंत पोहचविण्याचे काम मात्र आपल्यालाच करावे लागेल, व हे काम करत असतांना वनमंत्री म्हणून "दिलीपजी मै पूरी शक्ती के साथ वित्त खाता भी साथ मे लेकर आपके साथ खडा रहूंगा" ।

यावर्षी आपण अनेक निर्णय केले. दरवर्षी वनखात्याचा जो अर्थसंकल्प असतो, नियत व्यय असतो, त्यामध्ये वाढ केली और सक्सेनाजी वन खाता छोडके बाकी सबको कट लगा है । ये वन खाता ऐसा है जिसको हमने आखरी मे ऐसा तय किया है मार्च के आखरी ३०-३१ को १००% देदेना बाकी खातो को ध्यान मे नही आयेगा. इसलीये आपको १००% बजेट है । मुझे मालूम है की, वित्त विभाग को लगनेवाली नोट वन विभाग की लकडी से बनती है और इसलीये विभाग को पैसे मे कटौती नही होनी चाहीये । आणि म्हणून आपल्याला येणाऱ्या काळामध्ये जे आव्हान आहे, ते आव्हान कार्यक्रमाच्या चौकटी पूरते मर्यादित नाही. अकबर-बिरबलाची कहाणी तुम्ही ही ऐकली असेल की, अकबराच्या राज दरबारामध्ये एक बहुरुपीया हुबेहुब गाईच सोंग घेवून आला. गाईसारखा हंबरण्याचा आवाज काढायचा, गाईसारखा शेपूट हालवायचा. अकबर खुष झाला पण बिरबल महाविव्दान तो म्हणाला हे कसले गायीचे सोंग. एक दगड हातात घेतला आणि त्या गाईच्या पाठीवर ठेवला गाईनी तिची पाठ हलवली. बिरबलानी सोन्याच्या मोहरा काढल्या आणि त्या बहुरुपीयाच्या हातात दिल्या. अकबराने विचारले कशासाठी, त्यावर बिरबल म्हणाला बाकी सर्व सोंग करता येत, पण इतका छोटा गुण बहुरुपीयाने दाखवून दिला ह्याचे कौतूक वाटते. आणखी एक गोष्ट तुम्हीही ऐकली असेल, मी ही ऐकली, ती ही आहे. एक व्यक्ती अकबराच्या राज दरबारामध्ये सर्व भाषेमध्ये निपूण होता. अकबराने म्हटले याची कोणती मातृभाषा आहे. क्या बिरबल पहचान सकेंगा ? हां मै पहचान सकुंगा । बिरबलाने रात्री दोन वाजता झोपलेल्या त्या व्यक्तीवर बादलीभर पाणी टाकल आणि तो ज्या भाषेत बोलला ती त्याची मातृभाषा असल्याचे अकबरास सांगितले व म्हणाला की माणूस जेव्हा अचानक उठतो तेव्हा आपल्याच मातृभाषेत बोलतो. आपणसुध्दा जैविक विविधतेवर इतक्या बारकाईने लक्ष देण्याची आवश्यकता आहे अन्यथा आपली अवस्था अशी होईल की, मी भाषण देईल, आपण ऐकाल, आपण भाषण द्याल, अजून कोणी ऐकेल. जैविक विविधतेचे महत्व आम्ही सांगू आणि आपली अवस्था त्या नास्तीकासारखी होता कामा नये. एका नास्तीक माणसाने ४५ मिनिटे नास्तीकतेवर भाषण दिले व सांगीतले की ईश्वर नाही, आस्तीकता हा शब्द डिक्शनरीच्या बाहेर काढा. एकदा तो माणूस गाडीत बसला १ कि.मी. पुढे गेला, समोर

एक मंदीर होते. देवाला हात जोडले. ते पाहून ड्रायव्हर म्हणला ४५ मिनिटे याने नास्तीकतेवर भाषण दिले आणि आता देवाला हात जोडतो. त्याने विचारले सर ऐसा क्यु कर रहे हो। त्यानी म्हटले वैसे मै नास्तीक हु। परंतू रिक्स नही लेना चाहता। भगवान होगा तो फिर नाराज हो जायेगा। मला वाटले की आपले टारगेट आहे, जे लक्ष आहे, आपली जी भावना आहे, त्या भावनेपर्यंत आपल्याला पोहचविण्यासाठी प्रयत्न करावा लागेल. अन्यथा हे जैवविविधता मंडळ २०१२ मध्ये तयार करण्यात आल्याचे सांगीतले, आणि २०१२ पासून आपल्या जवळ खूप काम करावयाचे आहे कारण आत्ताच राज्यातील १६१ वनस्पती प्रजाती व ४८ वन्यप्राणी प्रजाती हे संकटग्रस्त घोषीत करण्याची अधिसुचना काढण्यासाठी केंद्र शासनाला प्रस्तावित केले आहे. इसका जल्दी पिछा करो नही तो ये प्रस्ताव करणे के बाद मंजूरी आने तक ये सब नष्ट हो जायेंगे। इसका फालोअप करना पडेगा । नाहीतर आपल्याकडे आहेच कि एक कागद निघाला तर तो कुठ गेला हे आपल्याला लक्षातही राहत नाही. त्यासाठी आपल्याला पूर्ण शक्तीने प्रयत्न केला पाहीजे. खरेतर प्रत्येक वन्य प्राणी हा ईश्वराशी जोडला गेला आहे. फक्त वन विभागासाठी आव्हान असलेल्या मनूष्याने कितीही पुण्य केले पण मोक्ष मिळू शकत नाही, कारण कावळा हा श्राध्दाच्या वेळेस प्रसादाला शिवलाच पाहीजे तरच शेवटी मोक्ष मिळतो. मोक्षही पाहीजे असेल तर वनखाते आहे. हमारे इधर कौवा अगर प्रसाद को छुता नही तो ऐसा सोचते की उसको मोक्ष नही मिलता। विश्वास-अंधविश्वास छोडो मगर ये बात आखरी दम तक वन खाते का क्या महत्व है ये अधोरेखांकीत करती है। ये महत्व है की तुमको यहा पे इहलोक छोडने के बाद परलोक मे भी मोक्ष चाहीये, तो नोट से लेके मोक्ष तक ये वन विभाग के बिना नही होता। आणि म्हणून आपल्या सर्वांना या खात्याच महत्व हे लोकांपर्यंत पोहचावे लागेल. हे लोकांपर्यंत पोहचवायाचे असेल, तर हा सरकारी कार्यक्रम राहता कामा नये. कारण सरकारी कार्यक्रम असला तर तो चौकटीत राहतो. मी १९९४ मध्ये आमदार नव्हतो तेव्हा मला आठवत की मी संघटनेचा उपाध्यक्ष होतो राज्यातील बुलढाणा येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर मोठ्या-मोठ्या भिंती रंगवून होत्या, निरक्षरांना साक्षर व्हा. मी मनात विचार केला निरक्षरांना हे वाचता आल असत तर निरक्षरांना साक्षर करणे समजू शकतो. पण निरक्षरांनी साक्षर व्हा हे त्याला वाचताच येत नसेल तर ? सरकारी कार्याक्रमामध्ये अशी गडबड होते आणि म्हणून लोक सहभाग वाढविण्यासाठी तुम्हाला-मला सर्वांना मदत करावी लागेल. अब आपके सामने दो प्रश्न उपस्थित हुऐ है, एक है आकृतीबंध का. १०८ या आसपास आपको कर्मचारी चाहीये आप मुझे एक प्रस्ताव दिजीये। हम देखते हे की आकृतीबंध के बारे मे सरकार नियोजन व वित्त विभाग की जरा ज्यादा नकारात्मक भूमिका होती है। पण कंत्राटी पद्धतीवर कर्मचारी घ्यायला काही अडचण नाही. उस पर हम सोचते है। और दुसरी बात जो आपने कही की ये जो हमारा मंडल है उसको अध्यक्ष नही है। महिने भर मे अध्यक्ष के लिए अच्छा नाम निकालीये ताकी अध्यक्ष भी हम देंगे।

आता कार्यालय उत्तम झाल. कार्यालयाचे दोन अर्थ होतात जिथे कार्याचा आलय असणे म्हणजे निवास असतो म्हणजेच कार्यालय आणि आपल्याकडे कार्याचा लय होतो ते कार्यालय आपल्याला या भूमिकेतून लय करण्याच्या ऐवजी त्याचा आलय करण्याकडे जायच आहे. आणि म्हणून हे जे कार्यालय आहे

हे कार्यालय राज्यासाठी, जैवविविधतेसाठी मार्गदर्शक ठरल पाहीजे और दिलीपजी येही शुभकामना देने खुद होकर मै ये कार्यक्रम मे आया । सही तो आज राम नवमी है । राम नवमी के ये शुभ दिन हमे अपने मतदार संघ मे रहना पडता है । मगर मुझे मालुम है की, अगर जैवविविधता को हम प्रोत्साहीत करेंगे जैवविविधता टिकने की हम कोशिश करेंगे तो हम आगे जा सकेंगे । आणि शेवटी एवढच मी सांगतो कि इथे बसलेल्या सर्वांनी एक गोष्ट लक्षात घ्यावयाची आहे की, ती जबाबदारी फक्त एकट्या दिलीपजींची नाही. तुमची आमची सर्वांची आहे. आपण चुक करता कामा नये. नाहीतर आपली चुक तशीच होईल की, बार बार वही गलती हम करते रहे थे धुल थी चेहरे पे और आईना साफ करते रहे. आम्ही वृक्ष वाढवले असते तर एअर कंडीशनची आवश्यकता पडली नसती. आता मात्र एअर कंडीशनच्या गरमी पासून बचाव करण्याचा प्रयत्न करावा लागला नसता आणि विज विभागाचे दर वाढले म्हणून विजेच्या संदर्भात सरकारला शिव्या देत सरकारच आयुष्य २५-२५ वर्ष वाढवत वसाव लागलं नसत. आणि म्हणून आपल्याला या दृष्टीकोनातून निसर्गाच शोषण नव्हे तर निसर्गाच दोहन आपण करण्याचा प्रयत्न करु या. रामनवमीचा दिवस आहे. पवित्र दिवस आहे. या दिवशी आपण संकल्प करु या आणि आपला हा संकल्प आपण रोज आपल्या डायरीमध्ये महिण्यातून एकदा तरी लिहून काढला पाहीजे. महिण्यातून मी माझ्या वतीने जैवविविधतेसाठी काय करेन हे मी सुध्दा माझ्या डायरीत लिहेन. आपणही डायरीत लिहा. आपण सर्व एकत्र येवून हे ईश्वरीय कार्य आहे, ईश्वराची श्रृंखला विविधता तुटता कामा नये. ईश्वराची ही श्रृंखला टिकविण्यासाठी ईश्वरांनी तुम्हाला मला एक लक्ष योनीतल्या श्रेष्ठ योनीमध्ये पाठवीले असे समजून थोडा आपला वेळ जैवविविधतेसाठी देवू. प्रत्यक्ष वेळ देवू शकलो नाही, कमीत-कमी एखाद्या सरपंचाला ५० पैश्याचे पोस्ट कार्ड पाठवून साध्या-साध्या गोष्टी करता येतात, और दिलीपजी आप भी एक काम करेंगे राज्य मे इसका महत्व रखना है, तो कुछ सिरियल बनाईये । पैसे चाहिये तो वित्त विभागसे आपको मिलेंगे । सारे चॅनल्स मे इनका महत्व बताईये । एक कोई अच्छा फिल्म बनानेवाले निकालीये । लोगो को जानने दो इसका महत्व क्या है । अपने लोग बडे इमोशनल है । एक बार अगर जनता तय करती है तो फिर बेहतर गतीसे वह जाती है । हमारी ओर से आपको बहोत बहोत शुभकामनाये और ये कार्यालय हमारे इस कार्य को आगे ले जाए । प्रभु रामजी की चरणो मे यही प्रार्थना के साथ मै मेरे मनोगत को विराम देता हूं ।

धन्यवाद,

जय विदर्भ, जय महाराष्ट्र

ooOoo